संत सखाराम महाराज चरित्र

लेखक : साने गुरुजी

संत परंपरा

१) श्री सखाराम महाराज

२) श्री गोविंद महाराज

३) श्री बाळकृष्ण महाराज

४) श्री प्रल्हाद महाराज

५) श्री तुकाराम महाराज

६) श्री कृष्णा महाराज

७) श्री बाळकृष्ण महाराज (आंधळे)

८) श्री वासुदेव महाराज

९) श्री पुरुषोत्तम महाराज

१०) श्री ज्ञानेश्वर महाराज

११) श्री प्रसाद महाराज (गादीपती)

विविध प्रसंगी प. पू. सखाराम महाराज

रथ व पालखी सोहळा

हा देखील एक अपुर्व सोहळा असतो. मनोहारी रंगाच्या पोशाखात नटविलेली लालजींची मूर्ती वाडी मंदिरातून सजविलेल्या पालखीत स्थानापन्न करण्यात येते तेथून बोरी नदीपात्रातील समाधी मंदिराला प्रदक्षिणा घालीत सकाळी ७ वाजेपासून सवाद्य पालखी मिरवणूक सुरू होते. संपूर्ण गावात फिरून पालखी समाधीमंदिराजवळ येत असते. पालखी बोरीनदीच्या पात्रात आल्यावर प्रसाद महाराजांचे किर्तन होते. यावेळी गुलालाची नयनरम्य उधळण होत असते.

श्री संत
सखाराम महाराज
यांचे चरित्र

लेखक : साने गुरूजी

चेतश्री प्रकाशन

चेतश्री प्रकाशन, अमळनेर

प्रकाशकाचे नाव :
सौ. विद्या चेतन सोनार
चेतश्री प्रकाशन
'मुक्ताई' धुळे रोड, अमळनेर

आवृती : द्विशताब्दी सोहळा २०१९
सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

मुद्रक :
सुनिल अमृतकर
जोगेश्वरी कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
देवपूर, धुळे
मोबा. ९३७२४३७६१७

मूल्य : ६१/-

अनुक्रमणिका

१. संत चरित्र का गावे १
२. जन्म व बालपन २
३. अमळनेरला आगमन ५
४. मामाच्या घरी ६
५. सखारामाचा संसार ७
६. झाड़ाखाली झोपी ९
७. सुखासाठी करिसी तळमळ तरी तू पंढरीसी जाई एक वेळ ११
८. नामसप्ताह १३
९. देवाने पाश तोडले १५
१०. वाढते भक्तीप्रेम १६
११. देवासाठी पुरात उडी १९
१२. देशमुखांवर संकट २१
१३. वाडीचे मंदिर २३
१४. संतांच्या भेटी २५
१५. शेवट २७
१६. उपसंहार ३०
विशेष लेख ३२

प्रकाशकाचे मनोगत

आज प्रकाशनाच्या वाटचालीत चेतश्री प्रकाशनास नव्याने पुस्तक प्रकाशीत करण्याचा व पुनश्च नव्याने प्रकाशन कार्य सुरू करण्याचा योग आला आहे. तोही पू. संत सखाराम महाराज यांच्या चरित्र पुस्तकाच्या प्रकाशनाने. खरं म्हटलं तर चेतश्रीने आजपर्यंत पू. साने गुरुजींचे प्रकाशीत व अप्रकाशित इ. साहित्यकृती प्रकाशित केलेल्या आहेत. आता पू. संत सखाराम महाराज द्विशताब्दी वर्ष सोहळा संपन्न होत असतांना पू. संत सखाराम महाराज यांच्या चरीत्राचे पुस्तक प्रकाशन आणि ते ही 'पू. साने गुरुजी लिखीत हा खरा दुग्ध शर्करा योग म्हणावा लागेल' कारण चेतश्रीने आज पर्यंत पू. साने गुरुजींचे २५-३० पुस्तके प्रकाशित केलेली आहे. आज चेतश्रीची वाटचाल सुरू असतांना पुढील काळात पु. साने गुरुजी/कुसुमाग्रज/वा. रा. सोनार आणि इतर अप्रकाशीत पुस्तके प्रकाशीत करण्याचा मानस असून पुढील येणाऱ्या वर्षात चेतश्री नव्या उमेदीने उभी राहून नव्या जुन्या लेखकांची पुस्तकं प्रकाशीत करेल. आम्ही चेतश्री ही एक चळवळच आहे ह्या दृष्टीकोनातूनच पुस्तके प्रकाशित केलेली आहेत व करीत राहू.

आ. कै. वा. रा. सोनार हे हयात असते तर त्यांना खुप खुप आनंद झाला असता कारण हे पुस्तक पू. साने गुरुजी जन्मशताब्दी वर्षात प्रकाशित करण्याची इच्छा होती व तो योग आज आला.

आज पू. सखाराम महाराज वाडी संस्थानच्या गादी परंपरेतील ११ वे गादीपती पू. प्रसाद महाराजांच्या आशिर्वादाने ह्या पुस्तकाचे प्रकाशन एवढ्या मोठ्या दिमाखदार द्विशताब्दी सोहळ्यात संपन्न होत आहे. या पुस्तकासाठी श्री. भाऊसाहेब देशमुख, ग्रंथमित्र, कार्यवाह, म.सा.प. शाखा अमळनेर व ज्यांनी ज्यांनी या पुस्तक प्रकाशनास मोलाचे सहकार्य केले त्या सर्वांच्या ऋणातच राहू इच्छीते.

- सौ. विद्या चेतन सोनार

दोन शब्द...

पू. संत सखाराम महाराज चरित्र हे पू. साने गुरुजी यांनी लिहीलेली चरित्र पुस्तक अचानक माझ्या हाती आले. पू. साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालय येथे कार्यवाह म्हणून काम करीत असताना पू. साने गुरुर्जींच्या वाङ्मयाचे दालन तयार केले त्यावेळी पू. गुरुर्जींचे सर्व लिखीत वाङ्मय संकलित करण्यात आले तेव्हा देखील या चरित्र ग्रंथाचा उल्लेख कुठे आढळत नाही तसे हा चरित्र ग्रंथ पुन्हा वाचकांपुढे आणणे आवश्यक होते.

अमळनेरच्या साहित्य विश्वातील चेतश्री प्रकाशनाचे नाव आणि कार्य महाराष्ट्र भर परिचित आहे. अमळनेर येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखा उद्‌घाटनाच्या वेळी आर्किटेक्ट श्री. चेतन सोनार चेतश्री प्रकाशन यांना प्रकाशनाचे कार्य स्व. साहित्यीक तात्यासो. वा. रा. सोनार यांच्या निष्ठेने पुढे सुरू ठेवण्याचे आवाहन केले होते तेव्हा त्यांनी येत्या काळात पुन्हा प्रकाशन करण्याचा मानस व्यक्त केला होता. चेतश्री प्रकाशनाने यापूर्वी पू. गुरुर्जींचे सुमारे तीस पुस्तके प्रकाशित केली आहेतच त्यामुळे या चरित्र ग्रंथाची प्रकाशनाची जबाबदारी ही त्यांनी घ्यावी असे आवाहन त्यांनी सहज स्विकारले.

पू. गुरूर्जींच्या वास्तव्याने अमळनेरची माती सुगंधित झालेली आहेच त्याच प्रमाणे संत सखाराम महाराजांच्या अध्यात्मिक वारसाने इथे भक्तीगंगा वाहत आहे. श्री. संत सखाराम महाराज द्विशताब्दी समारोह यावर्षी मोठ्या प्रमाणात संपन्न होत असून त्यानिमित्ताने या चरित्र ग्रंथाचे पुर्नःप्रकाशन म्हणजे दुग्ध शर्करा योगच म्हणायचा.

भाऊसाहेब देशमुख (ग्रंथमित्र)
कार्यवाह महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
शाखा अमळनेर

श्री सखाराम महाराज यांची गादी परंपरा

नाव	गादी	कारकिर्द	वैकुंठवास
श्री सखाराम महाराज	इ. स १७८०	३८ वर्षे	१८१८
श्री. गोविंद महाराज	इ. स. १८१८	३३ वर्षे	१८५१
श्री. बाळकृष्ण महाराज	इ. स. १८५१	१७ वर्षे	१८६८
श्री. प्रल्हाद महाराज	इ. स. १८६८	१७ वर्षे	१८८५
श्री. तुकाराम महाराज	इ.स. १८८५	११ वर्षे	१८९६
श्री. कृष्णा महाराज	इ.स. १८९६	१ वर्षे	१८९७
श्री. बाळकृष्ण महाराज (आंधळे)	इ.स. १८९७	३३ वर्षे	१९३०
श्री. वासुदेव महाराज	इ.स. १९०९	२२ वर्षे	१९५२
श्री. पुरूषोत्तम महाराज	इ. स. १९५२	१२ वर्षे	१९६४
श्री. ज्ञानेश्वर महाराज	इ. स. १९६४	२३ वर्षे	१९८७
श्री. प्रसाद महाराज	इ.स. १९८७		

संत चरित्र का गावे?

संत म्हणजे समाजाचे वैभव, समाजाचा संसार सुखाचा व्हावा म्हणून संत स्वत:च्या संसाराची होळी करतात. स्वार्थात लडबडलेल्या मनुष्याला दुसऱ्याच्या हिताचा विचार करावयास संत लावतात. जोपर्यंत व्यक्ती केवळ स्वत:चेच हित पहाते व त्या हितासाठी वाटेल ते करावयास तयार होते, तोपर्यंत समाजात आनंद दिसणार नाही. आपण सारे एकमेकांची मने सांभाळू, एकमेकांच्या जवळ येऊ, त्यावेळेसच सुखसमाधान नांदेल.

समाजात कसे वागावे हे संत दाखवितात. संत हे दीपस्तंभाप्रमाणे मार्ग दाखवतात. असे हे मार्गदर्शक संत देशोदेशी निरनिराळ्या काळात होत असतात. भारतवर्ष संत – भूमि म्हणून प्रसिद्ध आहे. भारतवर्षातील आपल्या महाराष्ट्रातही अखंड संतपरंपरा चालत आली आहे. महाराष्ट्राच्या शिरोभागी असणाऱ्या पूर्व खानदेश जिल्ह्यातही संतांनी जन्म घेऊन या जिल्ह्याला पावन केले आहे.

खानदेशाचे भाग्य काय वर्णावे? या खान्देशात चोपडे तालुक्यात उनपदेवजवळ प्रभु रामचंद्र रहात होते. एरंडोलजवळ पांडव राहत होते. अगस्ति ऋषींनी रावेर तालुक्याच्या बाजूला सातपुड्यात तपश्चर्या केलेली आहे. जळगाव तालुक्यातील कानळदे गांवी कण्व ऋषि रहात असत. मुक्ताबाई व चांगदेव यांच्या पुण्यपावन समाधी ह्या खान्देशातच आहेत. अशा या थोर खान्देशात शंभर दीडशे वर्षापूवीृ अनेक संत होऊन गेले. त्यात पाचोरे तालुक्यात बहुळानदीच्या तीरी दुसखेडे येथे

श्री. बाळानंद जामनेर तालुक्यात शेंदुर्णी येथे श्री. कडोबा तेली, एरंडोल तालुक्यात गिरणा काठी उत्राण येथे श्री. गोविंद गुजर आणि अमळनेरचे सखाराम महाराज हे विशेष प्रख्यात झाले.

या छोट्या पुस्तकात श्री. संत सखाराम महाराज यांची पुण्यकथा थोडक्यात सांगावयाची आहे. अमळनेरचे वाळवंट ज्यांच्या जयजयकाराने दुमदुमून जात आहे, त्यांचे चरित्र सोप्या शब्दात येथे द्यावयाचे आहे. श्री. सखाराम महाराजांचे दिव्य जीवन आपणास प्रकाश देईल. त्यांच्या चरित्रापासून स्फूर्ति मिळेल. त्याग करावा असे वाटेल. धर्मासाठी मरावे अशी बुद्धि होईल. अमळनेर शहर व अमळनेर तालुका निर्मळ व्हावा असे मनात येईल. हा खानदेश स्वच्छ, सुंदर, पवित्र करावा असे सर्वांच्या मनात येईल. संतांची चरित्रे यासाठी ऐकावयाची, वाचावयाची. चला तर आता, कान द्या व श्री. संत सखाराम महाराजांची कथा ऐका.

जन्म व बालपण

अमळनेर शहरापासून तीन कोसांवर चिखली नदीच्या काठी पिंपळी म्हणून गाव आहे. या चिखली नदीच्या तीरी हे पवित्र कमळ जन्मावयाचे होते. नदीचे नाव चिखली, परंतु चिखलात कमळे उगवतात, तसे येथे व्हावयाचे होते. या लहानशा नदीकाठच्या लहानशा गावातील एक मनुष्य एके दिवशी सर्व जनतेला वेड लावील असे कोणाला वाटले

असते?

या पिंपळी गावात रामभटजी म्हणून एक ब्राह्मण होते. त्यांचे आडनाव थेटे, भिक्षुकी करून ते रहात. त्यांच्या पत्नीचे नाव सीताबाई रामसीताचा हा जोडा मोठ्या सुखाने नांदत होता. परंतु पोटी पुत्र नाही म्हणून सीताबाई कष्टी होत. त्या पतीला म्हणाल्या. '' माझ्या पोटी पुत्र नाही, दुसरे लग्न करा'' शेवटी रामभटजींनी दुसरा विवाह केला. या दुसऱ्या पत्नीचे नाव नानूबाई, नानूबाई व सीताबाई बहिणीप्रमाणे नांदत भांडण नाही, तंटा नाही. नानूबाईसही पुत्ररत्न झाले नाही.

घरात पुत्ररत्न नाही म्हणून सर्वांना दुःख होई. परंतु एके दिवशी रामभटजीस स्वप्नात काही दृष्टांत झाला. सीताबाईच्या पोटी महान भगवद्भक्त जन्म घेणार असे त्यांनी स्वप्नात पाहिले. त्यांनी ते स्वप्न उजाडल्यावर पत्नीस सांगितले. सीताबाईंचा आनंद गगनात मावेना आणि पुढे खरोखरच सीताबाईस दिवस राहिले आणि नऊ महिने झाल्यावर शके १६७९ मध्ये मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीच्या दिवशी त्या बाळंत झाल्या. मुलगा झाला. मुलाचे नाव सखाराम ठेवण्यात आले. पुत्राचे कौडकौतुक सारे करीत. नानूबाईस मत्सर वाटू लागला. परंतु थोर मनाची सीताबाई म्हणाली '' हा तुमचाच मुलगा समजा. माझा नाही'' नानूबाईचे समाधान झाले. सख्खी माता व सापत्न माता यांच्यात भेद दिसेना. दोन मातांचे प्रेम सखाराम लुटीत होता.

बाळ सखाराम मोठा जिज्ञासू, लंगडा बाळकृष्ण देवात पाहून आईला विचारी 'हा देव एका पायाने लंगडा का?'' आई कृष्णाचे चरित्र सांगे ते ऐकून सखाराम तन्मय होई. सखारामाला गायीगुरांचा फार नाद.

गायीच्या वासराबरोबर खेळावयाचा, पळावयाचा.

बाळ सखाराम वाढत होता. परंतु एकाएकी मोठी आपत्ती आली. सखाराम पुरा पाच वर्षांचाही नव्हता. तोच सीताबाई स्वर्गस्थ झाल्या. सखाराम पोरका झाला. आई आई करून तो रडे. कोण त्याचे समाधान करणार? त्याला पुढे पंढरपूरची विठाई माऊली मिळावयाची होती.

आई वेगळ्या लेकराला रामभटजी जीव की प्राण करीत. त्या पिंपळी गावात भजनी मेळा असे. रामभटजी मुलाला घेऊन भजनाला जावयाचे. भजन ऐकता ऐकता सखाराम झोपी जावयाचा. आठ वर्षांचा सखाराम झाला. त्याची मुंज झाली. मुलाची मुंज झाल्यावर रामभटजी विरक्त झाले. सखारामाला जवळ घेऊन ते त्याला कितीतरी उपदेश करीत.

एके दिवशी आपण संन्यास घ्यावा असे रामभटजींच्या मनात आले. त्यांनी अमळनेरला आपल्या पुतण्याला निरोप पाठविला. पुतण्या रंगनाथ भगवी वस्त्रे व इतर साहित्य घेऊन आला. सखारामाच्या वडिलांनी संन्यास घेतला. संन्यास घेतल्यावर ते फार दिवस जगले नाहीत. सखारामाला एके दिवशी त्यांनी जवळ बोलविले. सखारामाने विचारले '' काय बाबा?'' वडील म्हणाले '' मी आता सच्चिदानंदी विलीन होणार. तू चांगला हो. देवाला विसरू नका. देहाची पूजा करू नको. सत्याने वाग, दयाधर्म पाळ, उपदेश देता देताच रामभटजींनी राम म्हटला.सखारामाचे वय केवळ नऊ वर्षांचे, आई नाही बाप नाही. परंतु तो जगत्पिता सर्वांना आहेच.

अमळनेरला आगमन

सखारामाची मुंज झाली होती. परंतु विद्या नाही, काही नाही. त्या पिंपळी गावात पाठशाळा नव्हती. तेथे गोवाऱ्यांबरोबर सखाराम खेळे, त्यांच्या बरोबर भजन करी, मुलांना जमवत तो खेळी मांडी.

एके दिवशी सखारामाचे चुलतभाऊ रंगनाथभटजी अमळनेराहून पिंपळीस आले ते नानूबाईस म्हणाले '' तुम्ही आता अमळनेरी चलावे. सखारामाचे शिक्षण होईल. सारी एकत्र राहू'' नानूबाई जात नव्हती. आपले स्वतंत्र गमविण्यास ती तयार नव्हती. परंतु गावकऱ्यांनी परोपरीने सांगितले. शेवटी नानूबाई जावयास तयार झाली. सारे सामान गाडीत घालण्यात आले. बाळ सखाराम सापत्न मातेसह अमळनेरी आला.

सखाराम तात्या पंतोजींच्या शाळेज जाऊ लागला. पंतोजीला सखारामाचा लळा लागला. रंगनाथभटजींची पत्नी राधा. राधा व नानूबाई यांचे पटेना.पटवून घेण्यासाठी मने मोठी करावी लागतात. त्यांचे नेहमी खटके उडत. ती भांडणे ऐकून सखारामाला वाईट वाटे तो रडे. परंतु त्याचे अश्रू कोण पुसून टाकणार?

अमळनेरलाही सखारामाचा भजनी आनंद कमी झाला नाही. जेथे भजन असेल तेथे तो जावयाचा. कथापुराण असेल तेथे तो जावयाचा. शाळेत शिकत होता. शाळेच्या बाहेरही तो शिकत होता. घरच्या कटु अनुभवानेही शिकत होता.

मामाच्या घरी

सखारामाचा मामा चोपड्याला रहात होता. मामाच्या मनात एके दिवशी आले की भाच्याला घेऊन यावे. मामाला मुलगा नव्हता. एके दिवशी श्रीधरमामा अकस्मात अमळनेरला आले. त्यांनी रंगनाथभटजींना गळ घातली. सखारामाने मामाकडे जावे असे नानूबाईसही वाटले. राधाबाई सखारामाला बोले. ते तिला खपत नसे. शेवटी मामा सखारामाला घेऊन गेले.

श्रीधरपंतांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई, लक्ष्मीबाई सखारामाला पोटच्या मुलाप्रमाणे वागवीत. चोपडे गावात पाठक भटजी म्हणून मोठे याज्ञिक होते. त्यांच्याकडे सखाराम वेद शिकण्यासाठी जाऊ लागला. सखारामाची स्मृति तीव्र होती. वेदाध्ययन झपाट्याने होऊ लागले. विनयी वृत्ति, गोड स्वभाव, प्रखर बुद्धि, निरलसता या गुणामुळे सखाराम सर्वांचा आवडता झाला.

सखाराम राहावयास आल्यावर लक्ष्मीबाईंना पुढे मुलगा झाला. सखारामाचा हा पायगुण असे सारी म्हणू लागली. लक्ष्मीबाईंची भाच्यावर अधिकच माया जडली. सखाराम सोळा वर्षांचा झाला. त्याचा विवाह करून द्यावा असे मामामामींच्या मनात येऊ लागले.

चोपड्यातच मुरारीभट म्हणून सच्छील गृहस्थ होते. त्यांची मुलगी गंगुबाई हिला श्रीधरपंतानी सखारामासाठी मागणी घातली. लग्न ठरले. अमळनेराहून रंगनाथ भटजी वगैरे सारी मंडळी आली. या समारंभासाठी एके दिवशी एक उतारू आला. त्याचे नाव विठ्ठलपंत तो ना कोणाच्या

ओळखीचा, ना माहितीचा, परंतु या समारंभात तो भाग घेई. त्याने काही उणे पडू दिले नाही. लग्न लागले. आलेली मंडळी परत गेली. एके दिवशी विठ्ठलपंताने सर्वांचा निरोप घेतला. विठ्ठलपंतांनी सर्वांचा लोभ संपादला होता. सर्वांना ते हवेहवे असे वाटले. मुरारीभटांच्या डोळ्यात पाणी आले. श्रीधरपंत सद्गदित झाले. विठ्ठलपंत सखारामाला म्हणाले, 'संसारात रहा. परंतु सावध रहा. सावधान, सावधान, संसारावर स्वार हो. संसाराला मानगुटीस बसू देऊ नकोस. मी पंढरपूरला असतो. ये एखादे वेळेस समजलास ना?' विठ्ठलपंत निघून गेले. कोठले कोण, काही कळेना, कोणी म्हणतो तो देव होता, पंढरपूरचा विठोबा होता!

सखारामाचा संसार

सखाराम आता वयात आला होता. लोक त्याला सखंभट म्हणून संबोधित सखंभटाने आता अमळनेरी जाऊन चुलतभावासह भिक्षुकी करावी असे मामाला वाटले. सर्वांनाच ते म्हणणे पटले. इतके दिवस सखाराम मामाकडे राहिला. मामाचे घर सोडताना सखाराम सद्गदित झाला. मामीने सखारामाला पोटाशी धरले. शेवटी दु:ख आवरून सखंभट अमळनेरला आला. सखंभट वृत्ति चालवू लागला. खेडोपाडी जाऊ लागला. परंतु ते वृत्तीचे काम त्याला जमेना. लाळघोटेपणा, तोंडपुजेपणा सत्यव्रत सखंभटाला माहीत नव्हता. ज्या ठिकाणी रंगनाथभट दोन चार रूपये मिळवी, तेथे सखंभट दोनचार आण्यात खूष होई. पैसे

मिळवण्याची कला असते. ती सखंभटाला साधेना. सखंभटाला परमेश्वर मिळविण्याची कला होती. दुसरी कला अवगत नव्हती.

अमळनेरला एक भगवद्भक्त ब्राह्मण होता. तो गीताज्ञानेश्वरीवर पुराण सांगे. तेथे वेदांतचर्चा चाले. सखंभट तेथे जाऊन बसे. वैराग्य अंगी बाणू लागले. संसारात फारसा राम त्याला वाटेना. रंगनाथभटजींची पत्नी राधा त्याला वाटेल ते बोले. " कवडीची अक्कल नाही. पै मिळविता येत नाही. लोकांना भार..." असे ती बोले. गंगूबाईला वाईट वाटे. एखादे दिवशी नानूबाई व राधाबाई दोघींची भांडण होई. त्या भांडणात गंगूबाई गरीब गाय सापडे. सखंभटाच्या मनात आले पंढरपूरला जावे. त्याने रंगनाथभटजींस विचारले. रंगनाथभट रागावले. "पंढरपूरास जाऊ पाहतोस? येथे तुझ्या सावत्र आईला कोण पोषील? तुझ्या बायकोची काय व्यवस्था? तिला आता दिवस आहेत. आमच्यावर भार टाकून पंढरपुराला पळतोस होय? ते काही नाही. यांची सारी व्यवस्था लाव नी कोठे तो जा." चुलतभावाचे भाषण ऐकून सखंभट खिन्न झाला. मनातच पंढरीच्या राण्याला आळवू लागला. एकेदिवशी गंगूबाई म्हणाली " आपण विभक्त होऊ" सखंभट म्हणाला " आपण होऊन व्हायचे नाही. आपल्यावर बोल येता कामा नये तू आता माहेरी जाशील. तिकडे चार महिने सुखाने रहा. पुढे पाहू. सारे सहन केले पाहिजे."

गंगूबाई बाळंतपणासाठी माहेरी गेली. सखंभट अधिकच विरक्त होऊ लागला. हृदयातील वैराग्यकंद पिकू लागला. सखंभटाचा सखाराम बुवा लवकरच होणार असे दिसू लागले.

झाडाखाली झोपडी

एकेदिवशी सखंभट पूजा करीत होता. देवाला आळवित होता. इतक्यात ''सखंभट सखंभट' अशी बाहेरून हाक आली. ती हाक कोणी मारली होती? एरंडोलचे रघुनाथ स्वामी बाहेर उभे होते. सखंभट बाहेर आला. दारात सद्‌गुरू पाहून त्याला प्रेमाचे भरते आले. रघुनाथस्वामी म्हणाले 'चल,माझ्या मागून ये''

सखंभट पाठोपाठ निघाला. आईमागे लेकरू, गायीमागे वासरू, तसा सखंभट चालला. ते दोघे कोठे थांबले? एरंडोलला आले तेव्हा. रघुनाथ स्वामींच्या घरी सखंभट राहिला. तेथे अनेक आध्यात्मिक चर्चा झाल्या. शेवटी रघुनाथस्वामींचा निरोप घेऊन सखंभट निघाला.

सखंभटाचे कशातही लक्ष नव्हते. मुखाने रामनाम गात मस्त होऊन रस्त्याने तो जात होता. इतक्यात विव्हळणे कानावर आले. उन्हात कोणी पडला होता. अंगाला क्षते पडलेला कुष्टी धुळीत पडला होता. सखंभटाने त्याला प्रेमाने उचलले. एका झाडाखाली नेऊन ठेविले. पल्लवांचे आंथरून घालून त्यावर झोपविले. सखंभटाने हिंडून पाणी आणिले. त्या तहानलेल्याला ते पाणी त्याने दिले. त्याचा दुवा घेऊन सखंभट पुढे निघाला.

सखंभट अमळनेरला आला. कोणाला न सांगता सवरता तो निघून गेला होता. त्याला घरात बोलणी खावी लागली. '' उगीच तुला पिंपळीगावाहून आणले. काडीचा उपयोग नाही.'' असे शब्द कानी पडत एकेदिवशी सखंभट म्हणाला, '' भाऊ मला एक खोली द्या. मी

निराळा राहतो. कशाला तुम्हाला त्रास?'' परंतु रंगनाथ भटजी घरात जागा देत ना.

शेवटी सखंभट उठला व मठात जाऊन वेदान्तचर्चा ऐकत बसला घरात त्याच्याने बसवत नसे. तिकडे गंगूबाई बाळंत होऊन पुत्ररत्न झाले मुलाचे नाव नारायण ठेवण्यात आले. नानूबाईला आनंद झाला. ती सखंभटाला म्हणाली सखाराम, हे दहा रूपये घे बाळंतविड्यासाठी म्हणून दे जा. सासुरवाडीस जा. बाळबाळंतीण बघून ये. मामामामीस भेटून ये.

संखभट निघाला. चोपड्याला मामाकडे आला. त्याने मामीजवळ ते १० रूपये दिले. ''संसारात नीट लक्ष ठेव. केवळ विरक्त होऊन कसे जमेल!'' वगैरे उपदेश मामीने केला. सखंभट चोपड्याहून अडावद येथे गेला. तेथे श्रीनिवास म्हणून एक वेदान्ती गृहस्थ रहात होते. त्यांच्या संगतीत सखंभटाचे काही दिवस गेले.

पुन्हा सखंभट अमळनेरला आला. गंगूबाई मुलासह आता येणार भांडणास ऊत येईल. कसे करावे? सखंभट चिंतेत होता. निराळे राहावे तर जागा चुलतभाऊ देईना. शेवटी एके दिवशी सखंभट उठला व गावाबाहेर बोरी नदीच्या तिरी गेला. गावची गढी तेथे होती. उत्तर बाजूला खरबूजवाडी होती. तेथे एक मोठे झाड होते. झाडाखाली सखंभट येऊन बसला. ईश्वराच्या विशाल घरात सखाराम रहावयास आला.

सखंभट कोठे गेला म्हणून सारे चौकशी करू लागले. एका झाडाखाली दोन दगड घेऊन सखंभट भजन करीत बसला होता. शांत बोरी वहात

होती. सखंभटाच्या डोळ्यातून प्रेमाश्रू घळघळत होते. तो पवित्र देखावा पाहून पाहणाऱ्यांची मने पाझरली. " सखंभट गावात चला" असा काहींनी आग्रह केला. " येथेही गावच आहे. मी गाव सोडून जात नाही" प्रेमळ सखंभट म्हणाले.

मित्रांनी त्या झाडाखाली सखंभटाला झोपडी करून दिली. सखंभट गावात कोरडी भिक्षा मागे. स्वयंपाक करी व खाई. बहुतेक वेळ नामस्मरणात जाई. ईश्वराचा ध्यास सखंभटाला लागला. सखंभट झोपडीत आला परंतु त्रिभुवनाचा सम्राट त्याच्या हृदयमंदिरात रहावयास आला.

सुखासाठी करिसी तळमळ
तरि तू पंढरीसी जाई एकवेळ

झाडाखाली झोपडीत सखंभट नांदू लागला. आता भिक्षुकीचा त्याग झाला. आता भिक्षावृत्ताने राहणे सुरू झाले. सखंभटाचा सखाराम बुवा झाला. सखारामबुवा भजनानंदात तल्लीन होऊ लागला.

गंगूबाई माहेरी होती. तेथे ती सारी वार्ता गेली. काहींना खेद वाटला काहींच्या डोळ्याला पाणी आले. गंगूबाई अमळनेरला जाण्यास उत्सुक झाली. पती झोपडीत असला तरी ती झोपडीच मला राजवाडा असे तिच्या मनाने घेतले. लहान लेकराला घेऊन ती निघाली. माहेरच्यांनी गाडी धान्याने भरून दिली. सखारामबुवा भिक्षा मागून रहात होता. मुलीची वर्षाची सोय माहेरच्यांनी करून दिली.

गंगूबाई अमळनेरला आली. गाडी झोपडीच्या दाराशी आली. गंगूबाई चिमणा नारायण पोटाशी धरून खाली उतरली. गाडीत धान्य होते. सखारामबुवाला ते घेववेना. तो म्हणाला, ' हे धान्य कशाला? आपण आता आपला भार जनतेवर घातला आहे. भिक्षान्नावर रहावयाचे मी निश्चित केले आहे. असे एकापासून कसे घेता येईल. गाडी अशीच परत जाऊ दे.'' गंगुबाईला वाईट वाटले. ती म्हणाली '' पुन्हा घेऊ नये. सध्या ठेवावे. माहेरच्यांना फार दु:ख होईल. त्यांची मने दुखावल्यासारखे होईल. उगीच मने का दुखवा एवढं राहू दे. '' सखारामबुवा म्हणाला, '' नाही. असे करता येणार नाही. पक्षपात आपणास करता येणार नाही. आता आपणास सारे सारखे जाऊ दे गाडी अशीच परत जाऊ दे आपण घेतलेले व्रत टाकता कामा नये. ''

धान्यासह गाडी परत गेली. इतके दिवस सखारामबुवा कोरडी भिक्षा मागे. आता ओली भिक्षा मागू लागले. कारण झोपडीत लहान बाळ स्वयंपाकाची दगदग नको. गंगूबाईही लहान व अशक्त दुसरे जवळ कोणी नाही. मधुकरी आणावी व उभयतांनी आनंदाने भक्षावी, असा क्रम सुरू झाला. मिळेल तो क्षण नामस्मरणात जाऊ लागला. संतांचे अभंग म्हणता म्हणता सखारामबुवाचे हृदय भक्तिप्रेमाने भरून येई. पंढरपूरास जावयाचे मनात फार येऊ लागले. शेवटी पंढरीच्या वारीस जावयाचे निश्चित झाले. भजनी दिंडीबरोबर सखारामबुवा पंढरपूरास गेला.

वाटेत भजन करीत सखाराम जाई. त्याच्या भजनात विशेष गोडी असे. लोक ते भजन ऐकून स्वत:ला विसरत. पंढरपूर जसजसे जवळ

येऊ लागले तसतसे सखारामाचे हृदय नाचू लागले. शेवटी एकदाचा कळस दुरून दिसला. डोळ्यांचे पारणे फिटले. आले पंढरपूर. जेथील अणुरेणु भक्तिभावाने भरला आहे ते पंढरपूर आले. जेथे संतांनी भक्तिप्रेमाचा पाऊस पाडला ते पंढरपूर आले. जेथे सखूबाईने प्राण सोडले. जेथे चोखा महाद्वाराच्या बाहेर मरून पडला, जेथे पिंगलेने ध्यानात रंगून ईश्वराशी एकरूपता मिळवली असे ते पंढरपूर.

पांडुरंगाच्या पवित्र मूर्तीचे दर्शन झाले. सखारामबुवा कृतार्थ झाला. अमळनेरला सखाराम आला, परंतु हृदयात पांडुरंग घेऊन आला.

नामसप्ताह

सखारामबुवा परत आला तो वेडापिसा होऊन आला. नामाशिवाय त्याला काही रूचत नसे, सुचत नसे. मधुकरी तो आणी. परंतु फार खाववेना. दोन घास सखाराम खाई. गंगूबाई दोनघास गिळी. बाकीची मधुकरी गायीगुरास देण्यात येई.

अमळनेर लहान गाव, त्या गावात काही चावट मंडळी होती. सखारामाची फजीती करावी असे त्यांच्या मनात आले. एके दिवशी काही लोक सखारामाला म्हणाले '' नामसप्ताह तू कर, अखंड नामसंकीर्तन सात दिवस होऊ दे. फार मजा येईल' सखारामाला ती कल्पना आवडली. संत विश्वास टाकतात. सखारामाला काही शंका आली नाही.

चैत्र वद्य तृतीयेला सखारामाने सप्ताह सुरू केला. परंतु सप्ताह कोणी

चालवायचा? कोणी वेळ वाटून घ्यावयाचा? कोणी येईना. एकटा सखाराम दिवसभर भजन करीत होता. न खाणे न पिणे मधुकरीस कोण जाणार? गंगुबाई कशी भजन करणार? लहानगा नारायण तिला सांभाळावयाचा होता.

दिवस गेला रात्र गेली. सखाराम विठ्ठल विठ्ठल गात होता. तो दुसरे दिवशी कोणी दोनचार लोक आले ते म्हणाले '' आम्ही नामसप्ताहात भाग घेतो. आणा टाळ'' देवाने मित्र पाठवले. सखारामाला आनंद झाला. नामसप्ताहाला रंग चढू लागला इकडे गावातील दुष्टांनी काय केले? आजुबाजुच्या अनेक खेड्यांना त्यांनी पत्रे पाठविली.'' येथे नामसप्ताह मांडला आहे. शेवटी प्रसाद आहे. तरी सर्वांनी यावे'' चिठ्ठ्या पाहून गावोगावचे लोक येऊ लागले. परंतु याची व्यवस्था कोण ठेवणार? सखारामावर प्रेम करणारे दोन भक्त होते. एक टिकंभट व दुसरा गोविंदा लोढारी. त्यांना फार वाईट वाटले.

भक्ताची काळजी देवाला असते. ज्याने देवावर भार घातला त्याचा भार देवाला घ्यावा लागतो. काही सज्जनांच्या मनात देव उभा राहिला काही लाडसके वाणी मंडळ उभी राहिली. त्यांनी धान्यांच्या गाड्या दिल्या. नामसप्ताहाच्या संपूर्णतेला काही उणे पडले नाही. मोठा सोहळा झाला. पालखी निघाली. अन्नसंतर्पण झाले. नामाचा जयजयकार बोरीच्या तीरावर घुमून राहिला. गावातील दुष्ट लोक शरमून गेले. सखारामाची किर्ती आसमंतात पसरली. कस्तुरीचा सुगंध दूरवर जाऊ लागला.

देवाने पाश तोडले

नामसप्ताह संपला. पंढरपूरला जाण्याची वेळ आली. सखारामबुवा निघाला. गावोगाव कीर्तने करावी, पुढे जावे असे चालले. बरोबर टिकंभट व गोविंदा लोढारी हे असावयाचेच. सखाराम तिकडे गेला परंतु इकडे अमळनेरला काय झाले? अमळनेरला पटकीचा उपद्रव झाला. लोक पटापट मरू लागले. गंगूबाईचा लहान वर्षा दीड वर्षाचा नारायण, त्याला पटकी लागली, एकटी गंगूबाई काय करणार? देवाचे तीर्थ हेच औषध, परंतु नारायण वाचला नाही. आईला सोडून तो निघून गेला.

पति दूर गेलेला, मुलगा मांडीवर मेलेला! गंगूबाई किती रडणार! दु:ख गिळून ती नामस्मरण करीत राहिली. पतीची श्रद्धा त्या साध्वीच्या रोमरोमांत शिरली. सखारामबुवा वारी संपवून माघारी आले. गावकरी त्यांना सामोरे गेले. त्यावेळेस कानावर नारायणाची मरणवार्ता पडली. '' प्रभूची इच्छा' सखाराम म्हणाला ते झोपडीच्या दारात आले. गंगूबाईला रडे आवरेना. '' नारायण गेला हो'' असे म्हणून ती केळीप्रमाणे जमीनीवर कोसळून पडली. सखारामाने पत्नीचे सांत्वन केले. तिला नीट संबोधिले. तिला उपदेश केला. गंगूबाई गंभीर झाली. ह्रदयात शांति आली. मेल्यासाठी रडणे म्हणजे वेडेपणा हे तिला कळले. गंगूबाई जरी सुखासमाधानाने राहू लागली, पुत्र दु:ख गिळून वागू लागली. तरी तिच्या मनावर फार परिणाम झाला, मनाचा परिणाम देहावरही दिसू लागला. गंगूबाई आजारी पडली. ती अंथरूणाला खिळली. तिला क्षय

झाला. सखाराम सारखी सेवा करी. मुखी राम हाती सेवेचे काम असे चालले होते. औषधोपचार होत होते. परंतु गुण पडेना. गंगुबाई वाचेल असे लक्षण दिसेना.

एके दिवशी गंगूबाई पतीला म्हणाली '' सुवासिनी बोलवा. मला त्यांची ओटी भरू दे'' सखारामाने सुवासिनी बोलविल्या. गंगूबाईने सर्वांना हळदकुंकू दिले. सुवासिनींच्या ती पाया पडली. अक्षय सौभाग्यवती हो असे तिने आशिर्वाद घेतले. सुवासिनी माघारी गेल्या. गंगूबाईला ग्लानी आली. ती पडून राहिली. गंगू आता इतर काही बोलेना. फक्त नामस्मरण तिचे चालले होते. ना आशा, ना इच्छा राम राम जपत गंगूने प्राण सोडला. मुलगा गेला, गोड गंगू गेली. देवाने बंध तोडले. सखाराम मोकळा झाला. भक्ति प्रेमाच्या समुद्रात सखाराम आकंठ डुंबू लागला. तो देवाचा वेडा झाला.

वाढते भक्तीप्रेम

बोरीच्या तीरावर टाळमृदुंगाचा आवाज कानावर यावयाचा. सखाराम रात्री कीर्तन करी. गावातील भाविक मंडळी कीर्तनास भजनास येत. तो चैत्र महिना होता. बाहेर पिठासारखे चांदणे पडले होते. सखारामाचे कीर्तन रंगात आले होते. इतक्यात एक भला मोठा नाग गढीच्या बाजूने फुसफुस करीत आला. लोकांची कोण त्रेधा. सखाराम शांतपणे उभा होता. समोरून फुत्कार करीत नाग येत होता.

'' नागोबा, भजनात गडबड कशाला केलीस? देवाच्या नामस्मरणात खंड पाडलास. हे चांगले नाही गड्या. ही फुसफुस् थांबव. तूहि कीर्तन ऐक'' असे म्हणून सखारामाने नागाला दंडवत प्रणाम केला. नाग शांत झाला. त्याची फुसफुस थांबली. लोक पुन: आजुबाजुला बसले. कीर्तनाला अपूर्व रंग चढला. मध्येच नाग फणा डोलवी. लोक '' पुंडलीक वरदे हरिविठ्ठल'' अशी गर्जना करीत. कीर्तन संपले. नागोबाला दूध देण्यात आले. नामामृत व प्रसादाचे दूध पिऊन संतुष्ट झालेला नाग निघून गेला. अशा या गोष्टी विजेसारख्या फैलावतात व त्याचा अपार परिणाम होतो. नागाला काठीने मारणारे कोट्यावधी आहेत. साप मारणाऱ्यांचे पोवाडे जग गात नाही. परंतु नागाला प्रेमाने वश करून घेणाऱ्यांची किर्ती जगभर जाते. सखारामाचा महिमा वाढला. परंतु सखारामाला स्वत:चा महिमा थोडाच वाढवावयाचा होता? त्याला ईश्वरी प्रेमाचा महिमा वाढवावयाचा होता.

दरवर्षाप्रमाणे सखारामबुवा वारीस निघाला. पंढरपुरात पटकीचा आजार फार होता. मरणाची भिती सखारामला थोडीच होती? आपुले मरण पाहिले म्यां डोळा' हा अभंग ते उगाच म्हणत नसत. पटकीने ते सचिंत झाले नाहीत. ते नामस्मरणात बुडून गेले. पांडुरंगाच्या मंदिराच्या दक्षिण द्वारासमोर सखाराम भजन करीत पावसात उभा होता. सखाराम बाहेरून ओलाचिंब झाला होता. आत भक्तिप्रेमाने थबथबला होता. सर्वत्र चिखल झाला होता. त्या चिखलात मध्येच सखाराम लोटांगण घाली. तहानभूक सारी हरपली. पोटाला भूक लागू नये म्हणून पोटाभवती धोतर बांधून टाकले. पोटाने गडबड करता कामा नये परंतु

अन्नपाण्याविना हा मातीचा देह कसा टिकणार? सखारामबुवा तेथे चिखलात मूर्च्छित होऊन पडला.

इतक्यात एक गृहस्थ हातात दुधात कालवलेले पीठ घेऊन आला त्याने सखारामाला जागे केले, शुद्धीवर आणले. सखारामाने ते पीठ खाल्ले मनुष्य नाहीसा झाला. सखाराम पुन्हा भजन करू लागला. नाचू लागला.

पंढरपुरात कान्होजी बडवे म्हणून श्रीमंत मनुष्य होता. त्याला रात्री स्वप्न पडले. '' जा, सखाराम महाराज भुकेले आहेत त्यांना जेवण दे'' कान्होजी जागा झाला. परंतु पुन्हा झोपला. तो काय आश्चर्य! कान्होजीच्या पाठीवर फटके बसले. कान्होजी कळवळून उठला. त्याच्या पाठीवर लाल वळ दिसत होते. अन्न घेऊन कान्होजी निघाला. सखाराम महाराज कोण असे विचारीत मंडळी निघाली. शेवटी कोणी सांगितले सखाराम महाराज कोण आम्हाला माहीत नाही. परंतु सखाराम महाराज तिकडे चिखलात सारखा किर्तन करीत आहे.

कान्होजी सखारामाजवळ आला व अन्न घ्या असे त्याने प्रार्थिले सखाराम म्हणाला, '' आता मध्यरात्र होऊन गेली. उदईक तुमच्याकडे भोजन करू कोणी पीठ देऊन गेला. आता चिंता नका'' कान्होजी बडवे निघून गेला. सखाराम किर्तन करीत राहिला.

सखाराम बुवाचा आता सखाराम महाराज झाला. सखाराम महाराज लोक म्हणू लागले. पंढरपूरची ही वार्ता पुण्याला गेली. पुण्याला तेव्हा दुसऱ्या बाजीरावाची कारकीर्द सुरू होती. त्याने सखाराम महाराजांना पुण्याला बोलविले. आळंदी देहू वगैरे ठिकाणी महाराजांना जावयाचे

होतेच. देहू आळंदी करून सखाराम महाराज पुण्याला आले. तुळशीबागेतील रामासमोर त्यांनी किर्तन केले. राव बाजी कीर्तनास हजर होते. राव बाजी प्रसन्न झाले. '' तुम्हाला काय देऊ'' असे विचारते झाले. सखाराम महाराज म्हणाले '' आम्हाला तर काही नको. परंतु पंढरपूरला पांडूरंगाच्या मंदिराच्या दक्षिण द्वाराला सभामंडप बांधून द्या''

बाजीरावाने सभामंडप बांधून दिला. तेथे सखाराम महाराजांशिवाय कोणी कीर्तन करीत नाही. चातुर्मासात तेथे दररोज कीर्तन होते. अमळनेरकरांचे स्थान म्हणून हा सभामंडप ओळखला जातो.

देवासाठी पुरात उडी

नित्याप्रमाणे सखाराम महाराज आषाढीच्या वारीला निघाले. शेवटचा मुक्काम होता. टोक्याचे कायगाव येथे मुक्काम पडला. तो नदीला प्रचंड पूर आलेला. गंगा दुथडी वहात होती. सारे वारकरी थबकले. परंतू आता पंढरीची वेळ कशी साधणार? नवमीचा दिवस उजाडला. एकादशीला पंढरपूरला गेलंच पाहिजे.

सखाराम महाराज म्हणाले '' देवावर श्रद्धा टाका व पुरात उड्या घ्या. ज्याच्या नावाने शिळा तरल्या तो आपणासही तारील. चला, मी तर निघालो. सारे चकीत झाले. कोणी उठेना. सखाराम महाराजांनी नदीत उडी घेतली. नदीने हजारो हातांनी भक्तरत्न हृदयाशी धरले त्याला फुलासारखे झेलीत परतीरी पोचविले.

तीन दिवसांनी पूर ओसरला वारकरी मंडळी पंढरपूरला आली. सखाराम महाराजांना सुरक्षित पाहून त्यांना आनंद झाला. सखाराम महाराजांची कीर्तने चालू होती. त्यावेळेस कोणी एक उत्तरेकडचा महंत पंढरपूरला आला होता. त्याच्याजवळ एक सुंदर मुर्ती होती. सखाराम महाराजांनी ती पाहिली. त्या स्वामीजवळ ती मूर्ती त्यांनी मागितली. स्वामी म्हणाला '' हजार हजार रूपये या मूर्तीचे देत होते. परंतु ही मूर्ती मी दिली नाही. तू काय मोल देतोस बोल?'' सखाराम महाराज आत गेले व एक तुळशीपत्र घेऊन बाहेर आले. ते म्हणाले 'रूक्मिणीने एका तुळशीपत्राने गिरीधर तुलिला. कुबेराच्या संपत्तीपेक्षा तुळशीपत्र अधिक हे तुळशीपत्र मी देतो. मला मूर्ती द्या' स्वामी प्रसन्न झाला. त्याने ती मूर्ती सखाराम महाराजांच्या स्वाधीन केली.

वारीहून परत येताना वाटेत चाळीसगावी महाराजांनी कीर्तन केले. चाळीसगावी एक बाई होती. तिने महाराजांना आपल्या घरी किर्तनास बोलविले. तिच्या घरी लालजीची पंचरसी सुंदर मूर्ति होती. सखाराम महाराजांचे कीर्तन झाले. रात्री बाईला दृष्टांत झाला. '' ही मूर्ति दे सखाराम महाराजांना'' दुसरे दिवशी लालजीची ती सुंदर मूर्ति बाईने महाराजांना दिली. महाराजांना मूर्ति पाहून परम सुख झाले.

अशा दोन मूर्ति घेऊन महाराज अमळनेरला आले. आपल्या झोपडीत त्या मूर्ति त्यांनी ठेवल्या. देवाला ती झोपडीच महामंदीर होते. कारण तेथे भक्तिप्रेम होते. तेथे पंचपक्वांनाचे नैवेद्य नसतील, अलंकार नसतील. परंतु तेथे भक्तीचे अनंत प्रेम होते.

देशमुखांवर संकट

रावबाजीची कारकीर्द म्हणजे सारी बजबजपुरी, कोणाची अब्रु सुरक्षित नसे. कोणाचा खून होईल, कोण अटकेत पडेल, कोणाचा अपमान होईल. कोणाची लूट होईल. याचा नेम नसे. कशाची शाश्वती नव्हती. घडीचा भरवसा नसे. या दुसऱ्या बाजीरावाला कारभारीही मोठे नामी मिळत. प्रजेला छळणे हेच त्यांचे काम असे.

पुण्याला बाळोबा कुंजर हा बाजीरावाचा दिवाण होता. नाशिक खानदेशच्या बाजूला त्रिंबकजी डेंगळा देखरेख करी. या त्रिंबकजी डेंगळ्याच्या मनात अमळनेरच्या देशमुखांशी सोयरिक करावी असे आले. त्याने त्याप्रमाणे इच्छा दाखविली. परंतु अमळनेरच्या देशमुखांनी ती गोष्ट नाकारली. देशमुख अस्सल खानदानी घराण्यातले ते काही केल्या तयार होईनात.

त्रिंबकजी चिडला. अपमानाचा बदला घेईन असे तो मनात म्हणाला. ती संधी पाहात होता. ती संधी आली. त्यावर्षी दुष्काळ पडला. वसूल मिळेना. अमळनेरचे देशमुख इकडचा वसूल गोळा करून मालेगावच्या राजेबहादुरांकडे जमा करीत. तेथून पुण्याला खजिना रवाना होई. पण देशमुखांना पैसे भरता आले नाहीत. त्यांचा नाईलाज झाला.

इकडे सखाराम महाराज नेहमीप्रमाणे वारीवर निघाले. त्यावेळचे देशमुख आनंदराव हे होते. आनंदरावांचे दोन मुलगे सखाराम महाराजांबरोबर निघाले. त्या दोन मुलांची नावे जयराम व खुशाल अशी होती. राम लक्ष्मणांची ती जोडी निघाली. मुलांबरोबर पांडोबा

नावाचे देशमुखांचे कारभारीही होते. ती गोड सुकुमार मुले घेऊन सखाराम महाराज पंढरपुरला आले. दक्षिण द्वारच्या नव्या बांधलेल्या सभा मंडपात किर्तन सुरू झाले. एके दिवशी किर्तन चालले असता अकस्मात त्रिंबकजी डेंगळा तेथे आला. त्याने पांडोबा व देशमुखांची मुले यांना कैद करून नेले. सखाराम महाराज शांत होते. त्यांनी ती गोष्ट देशमुखांस कळविली.

मुलांचे वडील आनंदराव शोकाकुल झाले. आपल्या मुलांचे हाल होणार या कल्पनेमुळे त्यांना काही सुचेना. त्यांनी राजेबहाद्दरांच्या कानावर सारी वार्ता घातली. माधवराव राजे बहाद्दर बाळोबा कुंजराला भेटले. आठ दहा हजार रूपये घ्या. परंतु मुलगे मुक्त करा असे बोलणे केले. परंतु कुंजर कबूल होईना. सारे उपाय थकले. देशमुख दुःखी झाले.

सखाराम महाराज देहु आळंदी करून पुण्यास आले. बाजीरावाने त्याना वाड्यात किर्तनाला बोलविले. महाराजांनी किर्तन केले. दुसरे दिवशी मेजवानी झाली. भोजनोत्तर महाराज दिवाणखान्यात बसले होते. रावबाजी तेथे आले. सुवर्णमुद्रिका घेऊन ते तेथे आले होते. बाजीराव मौल्यवान अंगठ्या घालू लागला. महाराज म्हणाले " आम्हाला या काय करावयाच्या? आम्हाला सोनेरूपे माणिकमोती काय करावयाची? बाजीराव म्हणाला " मग मी तुम्हाला काय देऊ" महाराज म्हणाले " माझी जिवंत रत्ने मला दे" बाजीरावाला उमज पडेना. महाराज म्हणाले " अमळनेरच्या देशमुखांचे दोन मुलगे त्रिंबकजी डेंगळा गिरफदार करून घेऊन गेला आहे ते मुक्त करा. प्रजेला पोटच्या

पोराप्रमाणे वागविले पाहिजे. ती माझी जिवंत रत्ने परत करा.''

बाजीरावाने बाळोबा कुंजराना बोलविले व देशमुखांची मुले आणून देण्यास सांगितले. देशमुखांची मुले आली. महाराजांनी त्यांना पोटाशी धरले. त्यांच्या डोक्यावरून हात फिरविला. अमळनेरला एक जासूद ताबडतोब त्यांनी पाठविला. मुले घेऊन महाराज पुन: पंढरपूरला आले. पांडुरंगाला प्रणाम करून मग ते खानदेशात यावयास निघाले.

जे काम आपणास अनेक खटपटींनी करता आले नाही ते महाराजांनी एका शब्दाने केले हे ऐकून राजेबहादूरांना फार आनंद झाला. देशमुख व राजेबहाद्दर दोघे महाराजांना सामोरे गेले. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

वाडीचे मंदिर

देशमुख व राजे बहादूर यांना महाराजांसाठी काही तरी करावे असे वाटू लागले. कृतज्ञता कशी प्रगट करावी याचा ते विचार करीत होते. शेवटी मंदिर बांधून द्यावे असे त्यांनी योजिले. एके दिवशी हा विचार सखाराम महाराजांजवळ त्यांनी मांडून दाखविला. महाराज म्हणाले '' मंदिर बांधावे चांगले होईल'' महाराजांची संमती मिळताच देशमुखांना आनंद झाला. मंदिराचे काम सुरू झाले. ज्या ठिकाणी महाराजांची झोपडी होती, त्याच ठिकाणी मंदीर उभारण्यात येऊ लागले. मंदिर बांधून तयार झाले. मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करावयाची होती. शके १७३९ अक्षयतृतीयेच्या दिवशी मुहूर्तमेढ बांधण्यात आली. वैशाख शु।। १४ मुख्य समारंभ करावयाचे ठरले. हजारो विद्वान आले. सर्व

ठिकाणचे संत आले. गावोगावच्या दिंड्या आल्या. जणू दुसरी पंढरी अमळनेरला आली. देशमुख व राजेबहाद्दर यांची मदत होती. परंतु सारी नीट व्यवस्था कोणी ठेविली?

अमळनेरला गोविंदा केसकर म्हणून एक कारभारी एका श्रीमंत घरी काम करीत. हा गोविंदा केसकर फार लोभी होता. महाराजांचा शब्द देशमुख व राजे बहाद्दरच काय, परंतु पुण्याच्या दरबारापर्यंत मानला जातो हे गोविंदा केसकर पहात होता. महाराजांच्या वशिल्याने पुढे मागे आपण खूप श्रीमंत व्हावे असे त्याच्या मनात येई. महाराजांकडे गोविंदा केसकर जा ये करी. वरवर स्तुती करावी, तोंडपुजेपणा करावा असे चाले. परंतु शेवटी परिणाम काय झाला?

सखाराम महाराज विरक्त, पैशाला शिवत नाही. कोणाजवळ काही मागत नाही. याचा गोविंदाच्या मनावर निराळाच संस्कार होऊ लागला. गोविंदाच्या मनातील पैशाचा लोभ मावळला. वैराग्य उत्पन्न होऊ लागले. सखाराम महाराजांबद्दलची खरी भक्ती त्याच्या हृदयात उत्पन्न झाली. संतांच्या दर्शनाला स्वार्थी हेतूने तो जाऊ लागला. परंतू संतदर्शनाने लोभ जाऊन भक्तिवैराग्य उत्पन्न झाले. या गोविंदा केसकरांनी सारी व्यवस्था ठेविली. सारी कामे कशी बिनबोभाट सहकार्याने घडून आणावयाची याची कला गोविंदास चांगली माहिती होती. त्यामुळे उत्सव व्यवस्थित पार पडला. हजारोंना संतर्पण झाले. विद्वानांना दक्षिणा मिळाली. सरदार जहागिरदार मानकरी यांना प्रसादाचे नारळ मिळाले. सखाराम महाराज केसकरांना म्हणाले " हा उत्सव कसा झाला हे लक्षात ठेव. याप्रमाणे दरवर्षी तुला करावे लागेल" केसकर

म्हणाले " आपण असल्यावर काय उणे?" महाराज म्हणाले, मी आता वारीवर जाणार. तू इकडे आहेस. आम्ही परत येतो न येतो! तू सारे पाहिले आहेस. असेच चालव. " महाराज असे का बोलतात ते त्यावेळेस कोणाच्या ध्यानात आले नाही. वैशाखी शुद्ध चतुर्दशीस असा महोत्सव होऊन महाराज आषाढीच्या वारीस निघून गेले.

संतांच्या भेटी

सखाराम महाराज मधून मधून खानदेशातील इतर संतांच्या भेटीस जात. येताना परस्परांस पाहून किती आनंद होत असेल?

" संतां सद्धिः संगः कथमपि हि पुण्येन भवति"

दोन सज्जनांची गाठ म्हणजे ती जीवाशिवाची गाठ, गंगायमुनाची भेट, हरीहरांची भेट, सज्जनांची भेट म्हणजे आत्म्याची आत्म्याला भेट.

एकदा सखाराम महाराज जामनेरला गेले होते. तेथे उत्राणकर गोविंदबुवा आले होते. गोविंदबुवास तेथे मेजवानी होती. मेजवानीला गावातील विप्रांस बोलविले होते. सखाराम महाराज आल्यामुळे सर्वांस आनंद झाला. परंतु सखाराम महाराजास आपल्या पंक्तिस घेण्यास जामनेरचे माध्यंदिन ब्राह्मण तयार होत ना. सखाराम महाराज त्यांना कमी वाटत होते! ज्याने ब्रह्मांडाचा धनी आपलासा केला, तो तेथील ब्रह्मवृंदास की वाटत होता! केवढा अहंकार, काय हे श्रेष्ठकनिष्ठपणाचे भाव!

१०

परंतु शेवटांची ब्राह्मणांची समजूत पटली. ते भोजनास आले. संतांच्या दर्शनाने सारे पवित्र होतात ही गोष्ट ब्राह्मणांस उमगली. गोविंदबुवा व सखाराम महाराज परस्परांस भेटले. त्यांच्या भक्तिप्रेमाच्या कथा झाल्या. सखाराम महाराज आनंदून निघून गेले.

शेंदुर्णीचा महान् भक्त कडू तेली, त्याच्याही भेटीला सखाराम महाराज गेले होते. तेथील त्रिविक्रमाची सुंदर मूर्ति महाराजांनी पाहिली. कडू तेल्याची थोर भक्ति पाहून सखाराम महाराज सद्गदित झाले. कडू तेली एकदा भजनानंदात तल्लीन होऊन जात होते. निंबाच्या झाडाची फांदी त्यांच्या डोळ्याला लागली! परंतु काय आश्चर्य! ती फांदी गोड होऊन गेली! संतांचा स्पर्श होताच कडू गोड का होणार नाही? विषाचे अमृत का होणार नाही?

सखाराम महाराजांचे गुरू अडावद येथे होते. श्रीनिवास गुरूला भेटावयास ते निघाले. बरोबर गोविंदा केसकर, टिकंभट व गोविंदा लोढारी हे तिघे होते. त्या बाजूला मान्या भिल्ल म्हणून मोठा दरोडेखोर होता. तो श्रीमंतास लुटी, मारी. त्याने या चौघास पकडून नेले. ढवळी बारी म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणी मान्या घेऊन गेला. तिघे भक्त घाबरले. सखाराम महाराज शांत होते. जवळ देवाची मूर्ति होती. ती भक्तांनी काढली. सखाराम महाराज भजन करू लागले. भजन सुरू झाले. मान्या भिल्लाने ते पाहिले. भीति न वाटता यांनी भजन सुरू केले आहे हे पाहून मान्य चकित झाला. पळून जाण्याची खटपट न करिता हे भजन करीत आहेत हे पाहून मान्याचे मन निर्मळ झाले. मान्या किर्तनास येऊन बसला. त्याचे साथीदार किर्तनास बसले. ढवळ्या

बारीत नामाचा गजर घुमून राहिला. मान्या सखाराम महाराजांच्या चरणी लागला. सखाराम महाराजांनी त्याला आशिर्वाद दिला. मान्य म्हणाला '' काही सेवा सांगा.'' महाराज म्हणाले '' दरवर्षी अमळनेरच्या उत्सवाला लाकडे देत जा. मंडपाला वगैरे जी लाकडे लागतील ती पुरवित जा.'' मान्याने कबूल केल. पुढे फॉरेस्टचे कायदे होईपर्यंत भिल्ल मंडळी मंडपाचे लाकडी सामान पुरवित असत.

मान्याने चौघांना अडावदला पोचविले. मान्या निघून गेला. सखाराम महाराज श्रीनिवासांकडे आले. सद्गुरूला त्यांनी साष्टांग प्रणाम केला. श्रीनिवासांना आनंद झाला. ते सखारामाला भेटावयास उत्सुक होते. त्याचीच वाट ते पहात होते. श्रीनिवास म्हणाले '' सखाराम, मला संन्यास दे. '' श्रीनिवासांनी संन्यास घेतला. श्रीनिवास म्हणाले '' आता माझी परंपरा तू चालव. परंपरा चालवावयास कोण भेटतो याची मी वाट पहात होतो.''

सद्गुरूस भेटून सखाराम महाराज आले. सखाराम महाराज आता निरवानिरवीची भाषा बोलत. भक्तांना त्याचा उलगडा होत नसे. परंतु सखाराम महाराजांचा अवतार संपवायचा होता.

शेवट

शके १७४० मधील तो चैत्र महिना होता. शुक्लपक्ष संपून कृष्ण पक्ष सुरू होता. त्या पहिल्या नामसप्ताहाची सखाराम महाराजांना आठवण झाली. पुन्हा एक नामसप्ताह सुरू करावा असे त्यांच्या मनात आले. हा

सप्ताहकाल सात दिवसच चालणार होता? नाही. वैशाख शुद्ध १४ पर्यंत तो चालणार होता. त्या दिवशी मंदिराचा वाढदिवस सोहळा होणार होता.

सप्ताहाच्या चिठ्ठ्या गावोगाव गेल्या. भजनी मेळे जमू लागले. सखाराम महाराज हातात चिपळ्या तंबोरी घेऊन उभे राहिले. जय जय रामकृष्ण हरि त्यानी जयघोष केला.नामसंकीर्तन सुरू झाले. सखाराम महाराज निराहार भजन करीत होते. ते अन्नाला स्पर्श करीत ना. देवाच्या पायाचे तीर्थ घेत. तीर्थात मला सारे मिळते असे ते म्हणत. महाराज अन्न घेत नाही असे पाहून गोविंदा केसकर उपवास करू लागले. तेही अन्न घेत ना. परंतु सखाराम महाराजांनी त्यांची समजूत घातली. त्यानी अन्न घेणे कष्टाने सुरू केले.

पंधरा दिवस झाले. सखाराम महाराज अहोरात्र उभे राहून नामस्मरण करीत होते. पोटात अन्न नाही. क्षणभर विसावा नाही. सारखी तंबोरी वाजत होती, मुखातून नामगंगा वाहत होती. त्या सुमारास महाराजांचे निष्ठावंत सेवक होते. ते सखाराम महाराजांच्या पाया पडून म्हणाले '' आपण बसावे. आम्ही रात्रंदिवस उभे राहू'' महाराजांनी कबूल केले. महाराज बसून भजन करू लागले.

वैशाखी चतुर्दशी जवळ आली. वाढदिवस मंदिराचा होता. पहिला वाढदिवस. गोविंदा केसकरांनी सारी व्यवस्था केली. देशमुख राजेबहाद्दुर यांची मदत होती. राजेबहाद्दरांनी हिंगणेगाव मंदिराला दिले होते. मंडप घातले गेले. धान्याच्या राशी पडल्या. बोरीचे वाळवंट स्त्री पुरूषांनी गजबजून गेले.

वैशाखी चतुर्दशी उजाडली. उपवासाचा अठ्ठाविसावा दिवस होता. नामसप्ताह चालला होता. विष्णुसहस्त्रनामाचे पाठ चालले होते. विष्णुसहस्त्र नामातील ''सर्वप्रहरणायुषाय नम: इति'' हे वाक्य म्हटले गेले. पुंडलीक वरदा हरि विठ्ठल गर्जना झाली. सखाराम महाराजांनी गोविंदा केसकरास जवळ बोलविले. आपली तंबोरी व चिपळ्या त्यांच्या हाती देऊन, गळ्यातील माळ त्यांच्या गळ्यात घातली. आणि सद्गदित होऊन पुढील अभंग त्यांनी म्हटला -

'चला पंढरीस जाऊ । रूक्मादेवेवरी पाहू
डोळे निवतील कान । मना तेथे समाधान
संतमहंत होतील भेटी । अखंड नाचू वाळवंटी
जन्म नाही वा आणिक । तुका म्हशी भाक।।

अभंग म्हणून गोविंदा केसकराच्या अंगावर महाराज पडले. पडले ते पडले. परमेश्वरपदी जाऊन ते जडले. ६१ व्या वर्षी देवळाच्या पहिल्या वाढदिवसाचे दिवशी सखाराम महाराजांनी देह ठेवला.

वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र गेली. चंदन कापराची चिता रचण्यात आली. नामाचा एकच गजर सुरू होता. सखाराम महाराजांचा पुण्यदेह अग्निदेवाच्या स्वाधीन करण्यात आला. सखाराम महाराजांचा देह गेला परंतु त्यांचे पावन चरित्र लाखोंना पावन करीत राहील.

उपसंहार

श्री सखाराम महाराजांचे हे लहान चरित्र संपले. त्यांच्या कितीतरी आख्यायिका आहेत, आठवणी आहेत. दुसऱ्या बाजीरावाने किर्तनाच्या वेळेस अंगावर भरजरी पोषाख टाकला. किर्तनाच्या भरात जवळच्या मशालीवर सखाराम महाराजांनी तो पेटवून दिला! दुसरे दिवशी बाजीराव पुन्हा नवीन पोशाख देऊ लागला. महाराज म्हणाले '' आम्हाला ही भरजरी वस्त्रे कशाला? रात्रीचा प्रसंग पाहिलात ना?'' केवढे हे वैराग्य.

पंढरपूरच्या वारीला जावयास महाराज जेव्हा निघत, तेव्हा झोपडीला काडी लावून जात. मागची काळजी नको. देवाकडे जाताना सर्व संपवून जात.

संसारासी आग । लावूनिया हाते ।।
मागूते परौते । पाहू नये

अशा वृत्तीचे ते होते. त्यांचे चरित्र किती गायिले तरी समाधान होणार नाही.

गोविंदा केसकर पुढे गोविंद महाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी वाडीची नीट व्यवस्था लाविली. सर्व खान्देशचे सहकार्य या कामी त्यांनी उपयोगात आणिले आहे. दरवर्षी उत्सव सुरू केला. वैशाखी शुद्ध ११ पासून पौर्णिमेपर्यंत यात्रा भरू लागली. दुसरी पंढरपुरी येथे शोभू लागली.

अमळनेरच्या बायकाच्या ओव्यात पुढील ओवी ऐकू येते.

पंढरीचा देव अमळनेरी आला ।
भक्तीला लुब्ध झाला पांडूरंग ।।

पंढरपूरचा पांडुरंग वैशाखी यात्रेच्या वेळेस अमळनेरात असतो. पंढरपूरला नसतो. अशी भक्तात आख्यायिका आहे. भगवान् भक्त असतात तेथे असतो. तो अन्यत्र कसा असणार?

असे हे सखाराम महाराजांचे चरित्र आहे. असा हा उत्सव सुरू झाला. या यात्रेत आपण मनाने थोर होऊ या, निर्लोभ होऊ या. यात्रेत येऊन काय नेणार? फळे खाणार, खेळणी घेणार, निरनिराळ्या वस्तू घेणार? संसाराला या वस्तू पाहिजेतच. परंतु संसार सुखाचा व्हावयास एका वस्तुची जरूरी आहे. सर्वांना प्रेम द्या. कोणाला तुच्छ मानू नका. भेदाभेद भ्रम, अमंगळ हे ध्यानात धरा. दुसऱ्याचे दु:ख पाहून दु:खी व्हा. परोपकार करा. दया, प्रेम, परोपकार ममता, निर्लोभता या वस्तू यात्रेतून विकत घेऊन जा. श्रीमंत सखाराम महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन मनाने निर्मळ व प्रेमळ होऊन जा. तरच यात्रेचे फळ, तरच श्रीमंत सखाराम महाराज की जय या गर्जनेला अर्थ. श्री सखाराम महाराजांचे चरित्र सर्वांची जीवने निर्मळ करो अशी त्यांच्याच चरणी भक्ति प्रेमाने प्रार्थना करून हे चरित्र संपवितो. म्हणा –

' श्री सखाराम महाराज की जय''

– साने गुरुजी

४

काळाची पावले ओळखणारे : अमळनेरचे प्रसाद महाराज

अमळनेर येथील विठ्ठल-रूक्मिणी संस्थानचे संतश्री सखाराम महाराजांच्या गादी परंपरेतील अत्यंत राजबींडे व अकरावे पुरूष प्रसाद महाराज यांनी १९८७ मध्ये वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी श्री सखाराम महाराज यांच्या गादीची अत्यंत खडतर आचारधर्म असलेली धुरा आपल्या खांद्यावर घेतली. आतापर्यंतच्या त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी केलेल्या कार्याने भाविक अक्षरश: भारावले आहेत, त्यांच्या भक्तगणात दिवसेंदिवस कमालीची वृद्धी होत आहे.

प्रसाद महाराजांनी जीवनातील अनेक लोभांचा त्याग करून ऐन तारूण्याच्या बहरात ब्रह्मचर्य पालन, संन्यस्तवृत्ती असे विरक्त जीवन स्वीकारले आहे. गादीपुरूष झाल्यापासून त्यांनी पूर्वपरंपरेनुसार चालत आलेली सर्व नियम, धर्म उत्तम प्रकार सांभाळले आहेतच, त्याबरोबरच दूरदर्शीपणाने काळाची पावले ओळखून अनेक नवे उपक्रम त्यांनी सुरू केले आहेत.

बाळकृष्ण महाराज (आंधळे महाराज) यांचा अपवाद सोडल्यास अन्य कोणीही महाराज कोल्हापूरला गेले नव्हते. प्रसाद महाराज अंबाबाईच्या दर्शनाच्या निमित्ताने तिकडे गेले. वाटेत मिरज, सांगली आदी ठिकाणी सुद्धा महाराज थांबले. पुढे मग बार्शी (भागवत दर्शन), तुळजापूर (भवानीमाता दर्शन), अक्कलकोट (स्वामी समर्थ दर्शन) गाणगापूर (दत्त दर्शन), नरसोबावाडी (दत्त दर्शन) सोलापूर (सिद्धराम दर्शन) असे पंढरपूरच्या जवळपास असलेल्या गावी त्यांनी प्रतिवर्षी जाण्याचे ठरवून त्या विभागातील लोकांना श्री सखाराम महाराज यांच्या गादीचा व कायाृचा परीचय करून दिला. पैठणला मुक्कामी असतांना ज्ञानेश्वर महाराज औरंगाबादला जाऊन येत होते. प्रसाद महाराजांनी तेथे मुक्काम करण्यास सुरूवात केली. अधिक महिन्यात मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी अशा नवीन भागात फिरस्ती केली. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात या नव्या विस्तृत क्षेत्रात श्री सखाराम महाराजांचे नाव झाले. श्री बाळकृष्ण महाराजांप्रमाणेच चारीधाम यात्रा आदि करण्याबाबत त्यांच्या योजना आहेत.

पंढरपूर येथील चार महिने मुक्कामाला होणाऱ्या खर्चासाठी प्रसाद महाराजांनी दात्यांकडून कायमस्वरूपी ठेवी स्वीकारून येणाऱ्या व्याजातून दात्यांच्या नावे भोजन प्रसादाची एक नवी योजना तयार केली. अल्पावधीतच शंभरपेक्षा जास्त देणगीदार होऊन ही योजना कमालीची यशस्वी झाली आहे.

अमळनेर व पंढरपूर येथील मठ, तसेच पैठण, आळंदी येथील मठ आदींचा जीर्णोद्धार करणे, त्यात नाविन्यपूर्ण सुधारणा करणे, आधुनिक सुखसोयींनी युक्त बांधकाम करणे व त्यातून संस्थानच्या उत्पन्नात वाए करणे आदींबाबत त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

सखाराम महाराजांच्या गादीपुरूषापैकी जे अमळनेर-पंढरपूर येथे महाराज वैकुंठवासी झाले. त्यापैकी फक्त पाच महाराजांच्या समाध्या बांधल्या गेल्या आहेत. परंतु अजून पाच महाराजांच्या समाध्या बांधावयाच्या राहिल्या आहेत. त्यासाठी त्यांनी 'समाधी जीर्णोद्धार' निधी योजना सुरू केली आहे. त्यालाही उत्तम प्रकारे प्रतिसाद मिळत आहे. लवकरच हेही काम सुरू होईल.

संस्थानच्या मालकीची हजारो एकर शेती आहे. त्यापैकी एक-दोन अपवाद सोडल्यास अन्य ठिकाणच्या शेतीचे नगण्य असे उत्पन्न संस्थानला मिळते. या रक्कमेतून मोफत दवाखाना, अभियांत्रिकी महाविद्यालय आदी उपक्रम सुरू करण्याचा त्यांचा संकल्प आहे व त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

प्रसाद महाराज यांच्या काळात फिरस्तीच्या वेळी पानसुपारी कार्यक्रमामुळे मिळणाऱ्या उत्पन्नात अभूतपूर्व वाए झालेली दिसून येते. या वाढत्या उत्पन्नातून त्यांनी संस्थानच्या विकासाच्या दृष्टीने काही कामे केली आहेत व पुढेही करण्याचा त्यांचय योजना आहेत. यात अमळनेर शहराचा समावेश शासनाचे 'तिर्थक्षेत्र' यादीत करणे व तिर्थक्षेत्र योजनेतून संस्थानचा विकास करण्याचा प्रस्ताव नगरपरिषदेच्या माध्यमातून शासनाला सादर केला आहे.

प्रसाद महाराजांनी काळाची गरज व कल लक्षात घेवून काही नवीन उपक्रम सुरू केले आहेत. त्यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण, टाळमृदंगाच्या साथीत तुकारामांच्या गाथाचे पारायण, गाथा अभंग सप्ताह, दासबोधाचे पारायण आदींचा समावेश आहे.

प्रसाद महाराजांनी सुरू केलेला आणखी एक उपक्रम म्हणजे त्यांनी आपले पिताश्री अर्थात गुरूंच्या म्हणजे श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी भजन, प्रवचन, किर्तन आदी कार्यक्रमांबरोबरच गायनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात येतो. ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रथम पुण्यतिथीला सुविख्यात गायक पंडीत भीमसेन जोशी यांचा संतवाणीचा कार्यक्रम आयोजित केला होता. तेव्हापासून दरवर्षी पुण्यतिथी दिवशी अनेक नामांकित गायकांचे कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात. अश्विन महिन्यात व दशमी, एकादशी, द्वादशी असे तीन दिवस श्री विठ्ठल मंदिरात देवासमोरच्या मोठ्या सभामंडपात भजनी नामजपाचा कार्यक्रम सुरू केला. पंढरपुरामधील बहुतेक सर्व महाराज, फडकरी, देवाचे सेवाधारी, वारकरी, नागरीक मोठ्या उत्साहात सहभागी होतात. टाळ मृदंगाच्या साथीवर सर्वजण मोठ्या आनंदात, नाचत-खेळत 'रामकृष्ण हरी' या नाममंत्राचे भजन सुमारे दोन तास करीत असतात. श्री तुकोबारायांनी 'खेळ मांडियेला वाळवंटी बाई', नाचती, वैष्णव घाई रे असे म्हटले आहे. त्याचा प्रत्यक्ष अनुभव या भजनाच्या वेळेस येतो. शेकडो वैष्ण टाळ मृदंग, पताका घेऊन रिंगण करत मोठ्या प्रेमाने, आनंदात भजन करतात. त्यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या त्याच्या भावाप्रमाणे एक अलौकिक समाधान प्राप्त होते. असा अनुभव आहे. अशा पद्धतीने नियमित स्वरूपात भजनी नामजपाचा सोहळा श्री प्रसाद महाराजांनी सुरू केला आहे.

श्री प्रसाद महाराजांच्या कारकिर्दीत गेल्या अनेक दशकाची वाटचाल पाहता त्यांच्या हातून संस्थानचा सर्वांगीण विकास होऊन संस्थानची महती संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही पसरणार, याबाबत खात्री वाटते. त्यांची कारकिर्द आता पूर्ण बहरात आली आहे. मात्र, यापुढेही धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांना खूप काही करण्याची इच्छा आहे. त्यांच्या कार्याची उत्तुंगता वाढेल, अशी भाविकांना अपेक्षा आहे.

भाऊसाहेब देशमुख

अमळनेर मोबा. ९४२०३८९५४१

महाराजांची पंढरपूर पायी दिंडी

आळंदी, देहूप्रमाणे अमळनेर येथूनही पंढरपूरसाठी पायीवारी निघत असते. अमळनेरच्या संत सखाराम महाराजांनी वयाच्या १५ व्या वर्षापासून पायी दिंडीची परंपरा सुरू केली. ती गेल्या अडीचशे वर्षांपासून आजही सुरू आहे. ऊन, पाऊस अथवा नैसर्गिक विघ्ने आली तरी दिंडीच्या दिनक्रमात कुठलाही बदल होत नाही.

कार्तिक शुद्ध पौर्णिमेला प्रसाद महाराज पांडुरंगाचे दर्शन घेऊन परतीचा प्रवास सुरू करतात देहू, आळंदी, पुणे, नगरमार्गे अमळनेरला ही पायीवारी येत असते. जवळपास ४२ दिवसांचा पायी प्रवास असतो. शहराच्या वेशीवर महाराजांचे जल्लोषात स्वागत होत असते.

अमळनेर येथील सखाराम महाराजांचा मठ

पंढरपूर येथील सखाराम महाराजांचा मठ

ह.भ.प प.पू. प्रसाद महाराजांच्या विविध भावमुद्रा





यात्रोत्सवाचे स्तंभरोपण